**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी,जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपिल/१९९/२०२३

दिनांक-२८.०३.२०२५

**प्रति,**

१. रामचंद्र लकुळा चव्हाण
सर्व रा.वळसंग, ता.जत, जि. सांगली

**विरूध्द**

१. केराप्पा येसाप्पा कोळी
२. शिवाप्पा निंगाप्पा बिराजदार
३. मल्लव्वा लक्ष्मण कोळी
४. चंद्रकांत बसाप्पा तेली
५. सिध्दाप्पा बसाप्पा तेली

सर्व रा. वळसंग, ता.जत, जि.सांगली ------------**जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

प्रस्तुत अपिल तहसिलदार,जत यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये क्र.जमिन/रस्ता वहिवाट/कलम-१४३/एसआर/१४/२०२२, दिनांक १२.०९.२०२३, प्रकरणी दिलेल्या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना सुनावणीकामी रितसर नोटीसा बजाऊन म्हणणे मांडणेची पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी त्यांचे अपील मेमोमध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. **जाबदार** नं. २ यानी दि.११/०८/२०२३ रोजी दिलेल्या म्हणणेचा या खालील मे. कोर्टानी विचार न करता निकाल दिलेला आहे तो या अपेलंट यांच्यावर अन्यायमूलक आहे. जाबदार नं.१ यास त्याच्या जमीनीस जाणे येणेसाठी जुना रस्ता अस्तित्वात असताना खालील कोर्टानी नवीन रस्ता देवून या अपेलंट यांच्यावर अन्याय केला आहे.

२. गट नं.८४ मध्ये पवनचक्कीचा रस्ता अस्तित्वात असताना त्या रस्त्यानेही जाबदार नं.१ यास ये-जा करता येत असताना खालील कोर्टानी नवीन रस्ता देवून अपेलंट यांच्यावर अन्याय केला आहे. जाबदार नं. १ यास त्याच्या गट नं.८३च्या जमीनीस लगत दक्षिणोत्तर चालीचा पवनचक्कीचा रस्ता अस्तित्वात असताना अपेलंट यांचे शिवेवरुन रस्ता देवून अपेलंट यांच्यावर अन्याय केला आहे.

३. वास्तविक पाहता ग.नं.८१ व ८२ च्या शिवेवरुन पवनचक्कीचे विद्युत वाहक डबल पोल असल्याने ग.नं.८१ व ८२च्या शिवेवरुन रस्ता देणे म्हणजे जिवीतास धोका निर्माण करणे असा आहे. त्यामुळे दिलेला रस्ता चुकीचा, बेकायदेशीर आहे.

४. तहसिलदार जत यांनी केलेला स्थळपाहणी पंचनाम्यावर पंचाची दोन्ही नांवे एकाच व्यक्तीने लिहिल्याचे स्पष्ट दिसत आहे व पंचनाम्यातील मजकूर वेगळ्या व्यक्तीने लिहिल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे तहसिलदार जत यांनी केलेला स्थळपाहणी पंचनामा बोगस, चुकीचा आहे.तहसिलदार जत यांचेकडे रस्ता मागणीसाठी केलेला अर्जावरील अर्जदार नं.२ यांची सही व अर्जदार नं.२ यानी कोर्टात सत्यप्रतिज्ञेवर घातलेल्या प्रतिज्ञापत्रावरील सही ही वेगळी असून ह्या वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे जाबदार नं.२ यांची अर्जावर केलेली सही जाबदार नं.१ यानी खोटी केल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे.

५. जाबदार नं.१ याने जाबदार नं. २ यांची खोटी सही करुन केलेला रस्ता मागणीचा अर्ज मुलतः चुकीचा व खोटा आहे. त्यामुळे चुकीच्या व खोट्या अर्जावर अवलंबुन खालील कोर्टानी जो निकाल दिलेला आहे. तो या अपेलंट यांच्यावर अन्यायमुलक आहे.

६. जाबदार नं.४,५ यांचे जे कबुली म्हणणे याकामी हजर केलेले आहे ते चुकीचे खोटे व लबाडीचे आहे. सदर जाबदार नं.४ व ५ हे कधीच खालील कोर्टात हजर राहून त्यांचे म्हणणे दिलेले नाहीत. त्यामुळे खालील कोर्टाने वरील तारखेचा निकाल दिलेला आहे तो या अपेलंटवर अन्यायमुलक आहे.

७. खालील कोर्टानी जाबदार नं.१ यांच्या शेतीस जाणे येणेसाठी तीन बाजुनी रस्ता अस्तित्वात असताना मंजूर केलेला रस्ता हा अपेलंट यांचेवर अन्याय मुलक आहे. खालील कोर्टानी रस्ता मागणीच्या अर्जावरील अर्जदार नं.२ ची केलेली खोटी सही पंचनाम्यावरील बिनहस्ताक्षरे यास गोष्टीचा विचार करता खालील कोर्टानी दिलेला निकाल हा या अपेलंट यांचेवर अन्यायमुलक आहे. अपेलंट व जाबदार हे या कोर्टाच्या स्थळसिमेत राहत असल्याने सदरचे अपील या कोर्टात दाखल केला आहे. तो चालविणेचा अधिकार या कोर्टास आहे.

**जाबदार १ यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने मुद्दे मांडले आहेत.**

१. जाबदार नं.१ यांनी त्यांचे जमीनीत जाणे येणे साठी कोणताही रस्ता उपलब्ध नसलेने तो मिळणेकामी म.ज.म.अ. चे कलम १४३ प्रमाणे रस्ता मिळावा असा अर्ज तहसिलदार, जत यांचे कोर्टात दाखल केला होता. सदरचा अर्ज तहसिलदार जत यांचेसमोर क्र.जमीन/रस्ता वहीवाट/कलम १४३/एसआर/१४/२०२२ प्रमाणे चालला. सदर कामी तहसिलदार, जत यांनी सदर कामी अपेलंट व जाबदार यांना नोटीसा काढून म्हणणे मांडण्याची संधी दिली.

२. तदनंतर अपेलंट तसेच जाबदार नं.२ ते ५ यांनी हजर होऊन म्हणणे दिलेनंतर तहसिलदार, जत यांनी स्थळपाहणी कामी तारीख नेमून नोटीसा काढल्या. व दिनांक २/०२/२०२३ रोजी मे. तहसिलदारसो, जत व मंडळ अधिकारी वळसंग यांनी प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहूनच योग्य असाच पंचनामा केला आहे व तो योग्य व बरोबरच आहे. तदनंतर यातील जाबदार नं. १ व अपेलंट तसेच इतर जाबदार यांचे म्हणणे ऐकून घेऊनच तहसिलदार, जत यांचेसमोर क्र.जमीन/रस्ता वहीवाट/कलम१४३/एसआर/१४/२०२२ जो आदेश केला आहे तो न्यायाचे दृष्टीने दिलेला आहे तो कायदेशीर व योग्यच आहे.

३. सदर रस्ता मंजूर झालेनंतर पोलीस बंदोबस्तात तहसिलदार जत तसेच मे महसूली अधिकारी व अपेलंट व जाबदार यांचे समक्ष सदरचा रस्ता तयार करुन दिले आहे. व त्याचा रिपोर्ट ही र.नं.३४/२०२४ ने दिनांक १५/५/२०२३ रोजी सादर केला आहे. जाबदार तसेच प्रत्यक्ष अपेलंट ही तो रस्ता वहीवाटीत आहेत तसेच अपेलंट व जाबदार ही त्याच रस्त्याने शेत माल बैलबारदान ने आण करत होते व आहेत. असे असताना सुध्दा केवळ जाबदार नं.१ तसेच इतर शेतकऱ्यांना त्रास द्यावा व रस्ता मोडीत काढावा या गैरउद्देशाने प्रस्तुत अपील दाखल केले आहे ते कायद्याने चालणेस पात्र नाही सबब ते रद्द करण्यात यावे. कोर्टाने केवळ अपेलंट चे खोट्या व बनावट मजकूराचा विचार करुन अपील मंजूर करुन मे. तहसिलदारसो जत यांचा आदेश रद्द केलेस पुन्हा यातील जाबदार नं. १ यांना तर त्रास देणारच आहेतच व त्याशिवाय इतर शेतकऱ्यांना देखील त्रास देतील व त्याच रस्त्याने ये जा करणारे शेतकरी यांना त्रास होणार आहे. मुळातच यातील अपेलंट यांना अशा प्रकारे अपील दाखल करणेचा व सदरचा वहीवाटीचा रस्ता मोडीत काढणेचा हक्क व अधिकारच येत नाही.

**जाबदार ३ यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने मुद्दे मांडले आहेत.**

१. मौजे वळसंग येथील गट नंबर ८३ ची मिळकत ही केराप्पा येसाप्पा कोळी यांची कब्जे मालकी वहीवाटीची मिळकत आहे. व त्यास लागूनच आमची मिळकती आहेत. केराप्पा येसाप्पा कोळी यांना त्यांचे जमीनीत जाणे येणे साठी कोणताही रस्ता उपलब्ध नसलेने तो मिळणेकामी म.ज.म.अ.चे कलम १४३ प्रमाणे रस्ता मिळावा असा अर्ज तहसिलदार, जत यांचे कोर्टात दाखल केला होता. दि.२/०२/२०२३ रोजी मे. तहसिलदारसों, जत व मंडळ अधिकारी वळसंग यांनी प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहूनच योग्य असाच पंचनामा करुन क्र. जमीन/रस्ता वहीवाट / कलम १४३/एसआर/१४/२०२२ मध्ये दिनांक ११/४/२०२३ रोजी जो आदेश केला आहे तो न्यायाचे दृष्टीने दिलेला आहे तो कायदेशीर व योग्यच आहे. सदर रस्त्याचा वापर आम्ही देखील करत असून त्यावरुनच आम्ही बैलबारदान शेती अवजारे, खते बि-बियाणे ने-आण करत असून तो रस्ता सोयीस्कर आहे. सदरचा रस्ता माझ्या जमिनीतून रस्त्याच्या पश्चिम बाजूने ४

फूट गेलेला आहे. त्या बाबत माझी कोणतीही तक्रार नाही त्यामुळे मे. तहसिलदारसो जत यांनी क्र. जमीन/रस्ता वहीचाट/ कलम १४३/एसआर/१४/२०२२ मध्ये जो रस्त्या बाबतचा आदेश केला आहे तो आदेश कायम करणेत यावा.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तीवाद प्रकरणी दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. प्रस्तुत अपिल तहसिलदार,जत यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये क्र.जमिन/रस्ता वहिवाट/कलम-१४३/एसआर/१४/२०२२, दिनांक १२.०९.२०२३, प्रकरणी दिलेल्या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे. उक्त तहसिलदार यांचा निर्णय रद्दबातल करून मिळणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी जाबदार १ ते २ यांची मौजे वळसंग, ता. जत येथील गट नंबर ८३ ची शेतमिळकत आहे. सदर मिळकतीस जाणे-येणेसाठी प्रस्तुत जाबदार ०१ व ०२ यांना रस्त्याची आवश्यकता असले कारणाने त्यांनी तहसिलदार जत यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये नवीन रस्त्याची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने तहसिलदार जत यांनी प्रत्यक्ष स्थळपहाणी व पंचनामा करून गट नंबर ८३ या शेतजमीनीमध्ये जाणे-येणेसाठी व शेतमाल वाहतूकीसाठी गट.नं.८३ चे पुर्व बाजू व गट नंबर ८६ चे पश्चिम बाजूने दोन्ही गटाचे उत्तरेकडील अंतीम हद्दीपासून पुढे गट नंबर ८१ चे पुर्व बाजू व ८२ चे पश्चिम बाजूचे सरबांधावरून उत्तर-दक्षिण चालीचा जत ते वळसंग शासकीय डांबरी रस्त्यापर्यत गाडी रस्ता मंजूर केलेचे दिसून येत आहे. सदर रस्ता मंजूर करणेची तहसिलदार यांनी केलेली कार्यवाही ही योग्य व कायदेशीर असल्याचे दिसून येत आहे.

३. वास्तविक, जाबदार यांना पर्यायी रस्ता आहे, त्यामुळे अपिलार्थी यांचे शिवेवरून रस्ता देऊन अपिलार्थी यांचेवर अन्याय केला आहे, गट नं.८१ व ८२ च्या शिवेवरून रस्ता देणे म्हणजे जिवीतास धोका निर्माण होणार आहे त्यामुळे दिलेला रस्ता चुकीचा बेकायदेशीर आहे. या वादीच्या दाव्यात कोणतेही कायदेशीर तथ्य दिसून येत नाही. जेव्हा शेतक-यास शेतात जाणेसाठी रस्त्याची निकड असते तेव्हाच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम कलम १४३ अन्वये नव्याने रस्ता मंजूर करणेचे अधिकार तहसिलदार यांना आहेत.

४. तहसिलदार यांना सर्वसमावेशक विचार करून नक्की कोणता रस्ता द्यावा याबाबत अधिकार आहेत. त्यामुळे तहसिलदार जत यांनी त्यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्व्ये प्राप्त अधिकाराचा वापर करून प्रतिवादी यांना शेतजमीन वहिवाटीसाठी दिलेला रस्ता उचीत, न्याय व कायदेशीर आहे असे माझे मत झाले आहे. यास्तव तहसिलदार,जत यांचे निर्णयात फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नसल्याने मी,अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी जत,उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

ठिकाण - जत
दिनांक -२८.०३.२०२५

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

प्रत -तहसिलदार जत, यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.